॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २२० वा | बुधवार, दि. ०८ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आखाती युद्धाचा भारतावर घाला

## अर्थव्यवस्था धोक्याच्या उंबरठ्यावर




**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** पश्चिम आशियात इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या भीषण युद्धाचे पडसाद आता थेट भारतीय अर्थव्यवस्थेवर उमटू लागले आहेत. दिवसेंदिवस तीव्र होत चाललेल्या या संघर्षामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, इंधनदरवाढ, महागाई आणि आर्थिक वाढीचा मंदावलेला वेग अशा अनेक संकटांची चाहूल भारतासह जगभर लागली आहे. त्यामुळे केंद्र सरकारने पर्यायी उपाययोजना तातडीने राबवण्याची गरज व्यक्त होत आहे.

**जीडीपी वाढीचा अंदाज घटला**

जागतिक पतमानांकन संस्था 'मूडीज' ने 2026-27 साठी भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) वाढीचा अंदाज 6.8 टक्क्यांवरून 6 टक्क्यांपर्यंत खाली आणला आहे. युद्धामुळे होर्मुझ खाडीतील महत्त्वाची वाहतूक विस्कळीत झाली असून, अनेक देशांसाठी ऊर्जा पुरवठा अडचणीत आला आहे. भारताच्या कच्च्या तेलाच्या गरजांपैकी सुमारे 55 टक्के आणि एलपीजीपैकी 90 टक्क्यांहून अधिक पुरवठा या भागातून होत असल्याने त्याचा थेट परिणाम देशावर होत आहे.

**महागाई वाढीची भीती**

खतांच्या आयातीवर परिणाम झाल्याने अन्नधान्याच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. 2024-25 मध्ये 2.4 टक्के असलेली महागाई 4.8 टक्क्यांपर्यंत जाऊ शकते, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. 1973 मधील तेलसंकटासारखी परिस्थिती निर्माण होण्याची भीती अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत. मात्र, सध्याच्या घडीला भारताची आर्थिक स्थिती मजबूत असली, तरी जागतिकीकरणामुळे बाह्य घटकांचा परिणाम अधिक तीव्रतेने जाणवू शकतो.

**आखाती देशांवरील अवलंबित्व चिंताजनक**

भारतात येणाऱ्या परकीय चलनापैकी सुमारे 40 टक्के हिस्सा आखाती देशांतून येतो. युद्ध दीर्घकाळ चालल्यास या उत्पन्नावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर निर्यात क्षेत्रावरही विपरीत परिणाम होऊ शकतो.

**अमेरिकेत इंधनदर विक्रमी पातळीवर**

युद्धामुळे अमेरिकेत पेट्रोलचे दर प्रति गॅलन 4 डॉलरच्या पुढे गेले असून, डिझेलच्या किमतीत 47 टक्क्यांची वाढ होऊन ते 5.50 डॉलरपर्यंत पोहोचले आहेत. खतांच्या किमती वाढल्याने अमेरिकन शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक बोजा पडला आहे.

तसेच, कतारमधून मिळणाऱ्या हेलियम वायूचा पुरवठा खंडित झाल्याने संगणक चिप्स उद्योगासह वैद्यकीय क्षेत्रालाही फटका बसत आहे. एमआरआय सारख्या उपकरणांसाठी आवश्यक असलेल्या हेलियमची टंचाई निर्माण होत आहे.

**अमेरिकन अर्थव्यवस्थेला मंदीचा धोका**

होर्मुझ खाडीतील तणाव कायम राहिल्यास अमेरिकेचा विकासदर 2.6 टक्क्यांवरून थेट 1 टक्क्यांपर्यंत घसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे 1970 च्या दशकातील 'स्टॅगफ्लेशन' सारखी परिस्थिती पुन्हा उद्भवू शकते— ज्यात महागाई वाढते पण आर्थिक वाढ मंदावते.

**भारतातील कर्जवाढीवर परिणाम**

युद्धापूर्वी देशांतर्गत अर्थव्यवस्थेत कर्जवाटपाचा वेग वाढलेला दिसत होता. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार बिगर-अन्न कर्जपुरवठ्यात 14 टक्क्यांची वाढ झाली होती. उद्योग, अभियांत्रिकी, रसायने, पेट्रोलियम आणि कापड क्षेत्रात कर्जाची मागणी वाढली होती.

मात्र युद्धानंतरच्या बदललेल्या परिस्थितीत उद्योगांच्या नफ्यात किमान 15 टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. भारतीय स्टेट बँकेच्या अंदाजानुसार कंपन्यांचा नफा सुमारे 2.75 लाख कोटी रुपयांनी घटू शकतो, जो जीडीपीच्या 0.8 टक्क्यांएवढा आहे.

**बेरोजगारी वाढीची शक्यता**

कॉर्पोरेट नफ्यात घट झाल्यास रोजगारनिर्मितीवर परिणाम होऊन बेरोजगारी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. उद्योगांचा विस्तार मंदावल्यास नव्या गुंतवणुकीलाही फटका बसू शकतो.

**पर्यायी धोरणांची गरज**

तज्ज्ञांच्या मते, या पार्श्वभूमीवर भारताने ऊर्जा स्त्रोतांचे विविधीकरण, स्थानिक उत्पादनवाढ, साठा व्यवस्थापन आणि आयात अवलंबित्व कमी करण्यावर भर द्यायला हवा. तसेच कृषी, ऊर्जा आणि औद्योगिक क्षेत्रात दीर्घकालीन धोरणात्मक बदल आवश्यक आहेत.

एकूणच काय तर आखाती युद्ध थांबले तरी त्याचे आर्थिक परिणाम दीर्घकाळ जाणवणार आहेत.

त्यामुळे केंद्र व राज्य सरकारांनी तातडीने दूरदृष्टीने पावले उचलली नाहीत, तर महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक मंदीचा फटका सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागणार आहे.

## पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापौर कोंड्याल यांची कडक सूचना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम, नियोजित व सुरळीत करण्याच्या दृष्टीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे आज सोलापूर महानगरपालिकेचे महापौर श्री विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली.या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, सिद्धेश्वर उस्तुर्गे, सर्व विभागीय अधिकारी, कनिष्ठ अभियंते, चावीवाले संबंधित कर्मचारी तसेच महावितरण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीत स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या'SCADA' (Supervisory Control and Data Acquisition) प्रणालीबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. या आधुनिक प्रणालीच्या माध्यमातून पाणीपुरवठा यंत्रणेवर रिअल-टाईम नियंत्रण ठेवणे,



गळती शोधणे, दाब व्यवस्थापन आणि पाण्याचे योग्य वितरण सुनिश्चित करणे शक्य होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शहरातील पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होण्यामागील प्रमुख कारणांवरही बैठकीत चर्चा करण्यात आली. विशेषतः महावितरणकडून होणाऱ्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे पाणी उचल केंद्रे (पंपिंग स्टेशन) प्रभावित होत असून त्याचा थेट परिणाम नागरिकांना मिळणाऱ्या पाण्यावर होत असल्याचे निदर्शनास आले. यावर उपाययोजना म्हणून महावितरण अधिकाऱ्यांनी आवश्यक त्या समन्वयातून अखंड वीजपुरवठा देण्याची जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश देण्यात आले.

यावेळी महापौर श्री विनायक कोंड्याल यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना देत सांगितले की, 'पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून त्यात कोणतीही तडजोड होणार नाही. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात पाणी मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.'

ते पुढे म्हणाले, 'वीजपुरवठा खंडित होणे, यंत्रणेमधील त्रुटी किंवा नियोजनाचा अभाव यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होणे अजिबात सहन केले जाणार नाही. SCADA प्रणालीचा पूर्ण क्षमतेने वापर करून पाणी वितरण अधिक पारदर्शक आणि नियंत्रित पद्धतीने करावे.'

महापौरांनी शहरातील पाणीपुरवठ्याचे प्रभावी नियोजन करण्यावर भर देत तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याच्या वेळापत्रकाचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले. तसेच प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रात नियमित पाहणी करून समस्या तात्काळ सोडवाव्यात, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

बैठकीत पाण्याचे टप्पे (रोटेशन) निश्चित करणे, गळती रोखणे, जलसाठ्याचे योग्य व्यवस्थापन करणे तसेच नागरिकांना कमी त्रास होईल अशा पद्धतीने वितरण व्यवस्था मजबूत करण्याबाबतही सखोल चर्चा करण्यात आली.

एकूणच, सोलापूर शहरातील पाणीपुरवठा अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.

## भोंदू अशोक खरात याच्या प्रतीकात्मक पुतळ्यास फाशी देऊन केले दहन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- राज्यात वाढत चाललेल्या अंधश्रद्धा, तंत्र-मंत्र आणि बुवाबाजीच्या नावाखाली होत असलेल्या शोषणाविरोधात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (माकप) वतीने आज तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील कुख्यात भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या निषेधार्थ सोलापूर येथे त्याच्या प्रतिकात्मक पुतळ्याला फाशी देऊन दहन करण्यात आले.

ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) आणि जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर) यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद, पूनम गेट येथे हे आंदोलन पार पडले. यावेळी कार्यकर्त्यांनी अंधश्रद्धेविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी सांगितले की, राज्यात तंत्र-मंत्र, अंगारे-धुपारे यांच्या नावाखाली महिलांचे व सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात शोषण सुरू आहे. अशोक खरात याच्या प्रकरणात अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी व मंत्री सामील असल्याचे समोर येत असून, ही अत्यंत गंभीर बाब आहे. संविधानाने अपेक्षित केलेला वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याऐवजी काही लोकप्रतिनिधी अंधश्रद्धेला खतपाणी घालत आहेत.

त्यामुळे समाजात चुकीचा संदेश जात आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.



महिला संघटनेच्या राज्याध्यक्ष कॉ. नसीमा शेख यांनी सांगितले की, अशोक खरातसारखे अनेक भोंदू बाबा राज्यातील गावागावांत व शहरांमध्ये कार्यरत असून, ते भोळ्या-भाबड्या नागरिकांचे विविध प्रकारे शोषण करत आहेत.

माकपच्या राज्य कमिटी सदस्य तथा माजी नगरसेविका कॉ. नलिनीताई कलबुर्गी यांनीही या प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. अशोक खरात याची संपूर्ण मालमत्ता जप्त करून ती अंधश्रद्धा निर्मूलनासाठी वापरण्यात यावी, तसेच या प्रकरणात सामील असलेल्या ३९ आमदारांची नावे जाहीर करून त्यांचे तत्काळ राजीनामे घ्यावेत, असे त्यांनी सांगितले. तसेच, पीडित महिलांचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याने त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का बसत असून, ते तातडीने हटवावेत, अशीही मागणी करण्यात आली.

या आंदोलनादरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांना शिष्टमंडळाद्वारे निवेदन सादर करण्यात आले. या शिष्टमंडळात कॉ. नसीमा शेख, नलिनीताई कलबुर्गी, लिंगाव्वा सोलापुरे, शकुंतला पाणीभाते, अफसाना बेग आदींचा समावेश होता.

यावेळी माकपचे राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. एम. एच. शेख यांनी सांगितले की, पुरोगामी महाराष्ट्राला अंधश्रद्धेची गरज नसून विवेकवाद व वैज्ञानिक दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. समाजात आजही अनेक 'अशोक खरात' अस्तित्वात असून, त्यांना संपवण्यासाठी विवेकवाद हा एकमेव पर्याय आहे.

या आंदोलनाच्या यशस्वी करण्यासाठी राज्य समिती सदस्य दत्ता चव्हाण, शेवंता देशमुख, ॲड. अनिल वासम, व्यंकटेश कोंगारी, रंगप्पा मरेड्डी, हनिफ सारखेड, फातिमा बेग,विल्यम ससाणे, दाऊद शेख, नरेश दुगाणे, दीपक निकंबे, विक्रम कलबुर्गी, अकील शेख,वीरेंद्र पद्मा,बालकृष्ण मल्याळ, विजय हरसुरे, बापू साबळे, रफिक काझी, बालाजी तुम्मा ,सनी शेट्टी, बजरंग गायकवाड, आदींनी परिश्रम घेतले.

## नागरिकांनी क्यूआर कोड द्वारे घरी बसून ई केवायसी करावे: जिल्हाधिकारी कार्तिकेयन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात बीपीसीएल, आयओसीएल व एचपीसीएल या तीन गॅस कंपनीच्या एकूण २० गॅस एजन्सी कार्यरत असून गॅस एजन्सी समोर नागरिक ई केवायसी साठी तसेच गॅस सिलेंडर बुकिंगची माहिती घेण्यासाठी गर्दी करत आहेत. तरी नागरिकांनी घरी बसून क्यूआर कोडच्या माध्यमातून ई केवायसी करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी केले. जिल्हाधिकारी कार्तिकेयन पुढे म्हणाले की जिल्ह्यात एलपीजी चा पुरेसा साठा उपलब्ध आहे नागरिकांनी ऑनलाइन बुकिंग करावे, त्यांना विहित केलेल्या कालावधीत घरपोच गॅस सिलेंडर मिळणार आहे. त्याप्रमाणेच नागरिकांनी ई केवायसी करण्यासाठी प्रशासनाने उपलब्ध करून दिलेला क्यूआर कोड चा वापर करावा. सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवावर विश्वास ठेवू नये.

व गरज नसताना बुकिंग करू नये. सोलापूर जिल्ह्यासाठी पेट्रोल, डिझेल व एलपीजी चा मागणीप्रमाणे साठा उपलब्ध होत आहे, असे त्यांनी सांगितले.

गॅस एजन्सीमध्ये ई केवायसी करण्यासाठी तसेच बुकिंग ची माहिती विचारण्यासाठी ग्राहकांची



गर्दी होत असल्याने जिल्हा प्रशासनाकडून ग्राहकांसाठी तक्रार निवारण केंद्र उभारले असून यासाठी पुरवठा विभागाचे तीन कर्मचारी तसेच एचपीसीएल बीपीसीएल व आयओसीएल या कंपनीचा एक एक प्रतिनिधी नियुक्त करण्यात येत आहे. या कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडे गॅस सिलेंडरच्या अनुषंगाने आलेल्या तक्रारी विषयी त्यांचे निवारण करून समाधान करत आहेत असे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले. सोलापूर शहरातील LPG ग्राहकांचे ekyc करणे प्रक्रिया व घरपोच सिलेंडर पुरवठा करण्याबाबत सूचना

आपण सोलापूर शहरातील अधिकृत एलपीजी ग्राहक आहात

कृपया आपले गॅस कनेक्शन सुरू ठेवण्यासाठी ekyc करण्याबाबत आपण संबंधित gas एजन्सी मध्ये न जाता मोबाईल द्वारे ekyc ची प्रक्रिया पूर्ण करता येईल. त्यासाठीचा क्यूआर कोड प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सर्वप्रथम आपण खालीलप्रमाणे ॲप play स्टोर मधून डाउनलोड करावे

१.IOCL कंपनीचे जी ग्राहक असल्यास क्ल्लिल्ली Oil ONE हे ॲप डाउनलोड करावे

२.BPCL कंपनीचे ग्राहक असल्यास BPCL For Business हे ॲप download करावे

३.HPCL कंपनीचे ग्राहक असल्यास HP PAY हे ॲप download करावे.

**वरील ॲप मध्ये माहिती भरून**

Adhaar Face RD 'ff appvarun प्रमाणित करून आपले ekyc त्वरित पूर्ण करून घ्यावे.

तसेच आपली गॅस बुकिंग झाली असल्यास आपल्याला विहित वेळेत घरपोच गॅस सिलेंडर पुरवठा होणार असल्यामुळे कृपया गॅस एजन्सी समोर रांगेत उभे राहू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासन यांच्याकडून करण्यात येत आहे.

## सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये पाच दिवसीय 'IDE बूटकॅम्प 2026' ला उत्साहात प्रारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे पाच दिवसीय इनोव्हेशन, डिझाईन अँड एंटरप्रेन्योरशिप (IDE) बूटकॅम्प 2026 ला उत्साहात प्रारंभ झाला.

दि. ६ ते १० एप्रिल दरम्यान होणारा हा उपक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) व केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल (MIC) यांच्या पुढाकारातून, वाधवानी फाउंडेशन आणि SBI फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे. या बूटकॅम्पसाठी सिंहगड संस्थेची राष्ट्रीय पातळीवर 'नोडल सेंटर' म्हणून निवड झाल्याने नवोपक्रम क्षेत्रातील संस्थेच्या कार्याची दखल घेतली गेली आहे. देशभरातील ३० केंद्रांवर तीन टप्प्यांत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात सुमारे



६,५०० विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित असून, सोलापूर केंद्रात २०० ते २५० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

उद्घाटन कार्यक्रमात AICTE इनोव्हेशन सेंटरचे रीजनल कन्सल्टंट सौरभ निमार्ले यांनी बूटकॅम्पचा उद्देश स्पष्ट करताना, 'विद्यार्थ्यांनी नवकल्पना विकसित करून त्याचे उत्पादनात रूपांतर करावे आणि स्टार्टअपच्या दिशेने वाटचाल करावी,' असे सांगितले. यावेळी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, रिसर्च डायरेक्टर प्रा. एस. एच. पवार, तसेच प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. पवार यांनी ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा क्षेत्रातील स्टार्टअप्सच्या संधींबाबत माहिती देत संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले. लक्ष्मी हायड्रॉलिक्स लि.चे अध्यक्ष निरंजन सिंघवी यांनी नवीन उत्पादन विकास, त्याचे कॉस्टिंग आणि बाजारातील उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन केले.

वाधवानी फाउंडेशनच्या मास्टर ट्रेनर्स (पान 2 वर..)

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## संपादकीय

# आकड्यांपलीकडील राष्ट्रनिर्मितीचा आराखडा

संपूर्ण जगाला वेढून टाकणाऱ्या कोरोना महासाथीने अनेक देशांची विकासयात्रा काही वर्षे मागे ढकलली. भारततही याचा मोठा परिणाम झाला आणि दर दहा वर्षांनी नियमितपणे होणारी जनगणना प्रक्रिया तब्बल पाच वर्षे लांबणीवर पडली. सन २०२१मध्ये होणारी ही महत्त्वाची राष्ट्रीय मोहीम अखेर आज, १ एप्रिलपासून सुरू होत आहे. पश्चिम बंगाल वगळता देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये या प्रक्रियेला प्रारंभ होत असून, देशाच्या प्रशासन, धोरणनिर्मिती आणि विकासाच्या दृष्टीने हा अत्यंत निर्णायक टप्पा ठरणार आहे. २०११च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या सुमारे १.२१ अब्ज इतकी नोंदवली गेली होती. गेल्या दशकात झालेल्या लोकसंख्यावाढीचा वेग लक्षात घेता हा आकडा आता १.४६ अब्जच्या घरात पोहोचण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, जनगणना म्हणजे केवळ लोकसंख्या मोजण्याची प्रक्रिया नाही; ती देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक वास्तवाचे आरसे आहे. प्रत्येक नागरिकाच्या जीवनमानाशी संबंधित असंख्य बाबींचे अचूक चित्र या प्रक्रियेतून समोर येते. भारतातील सामाजिक रचना अत्यंत गुंतागुंतीची आहे. विविध जाती, धर्म, भाषा, प्रादेशिक वैशिष्ट्ये आणि आर्थिक स्तर यांच्या उभ्या–आडव्या धाग्यांनी ही रचना विणलेली आहे. अशा परिस्थितीत शासनाने आखायच्या योजना, निधीवाटप, अनुदाने आणि कल्याणकारी धोरणे यासाठी ठोस, शास्त्रशुद्ध आणि अद्ययावत आकडेवारी असणे अत्यावश्यक ठरते. जनगणना हीच ती भक्कम पायाभूत प्रक्रिया आहे, जी शासनाला वास्तवावर आधारित निर्णय घेण्यास सक्षम बनवते. यंदाच्या जनगणनेतील सर्वाधिक चचेर्चा आणि संवेदनशील मुद्दा म्हणजे जातगणना. आरक्षणाच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांभोवती गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वादळे उठली आहेत. विविध समाजघटकांकडून आपापल्या हक्कांसाठी आंदोलने झाली, न्यायालयीन लढाया सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर जातनिहाय अचूक माहिती उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. केवळ भावनिक किंवा राजकीय पातळीवर नव्हे, तर वस्तुनिष्ठ आकडेवारीच्या आधारे निर्णय घेण्याची वेळ आता आलेली आहे. जातगणनेतून मिळणारी माहिती ही केवळ आकडे नसतील, तर ती सामाजिक न्यायाच्या धोरणांना दिशा देणारी ठरेल. कोणत्या घटकाला किती प्रतिनिधित्व मिळते, कोणत्या समाजघटकाची स्थिती मागासलेली आहे, कोणाला अधिक संधी देण्याची गरज आहे—या सर्व प्रश्नांची उत्तरे या प्रक्रियेतून मिळू शकतात. अर्थात, यामुळे काही ठिकाणी अस्वस्थता किंवा मतभेद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, दीर्घकालीन दृष्टीने समाजातील समतोल राखण्यासाठी हे वास्तव स्वीकारणे गरजेचे ठरेल. डिजिटल युगात होत असलेली ही जनगणना आणखी एका दृष्टीने महत्त्वाची आहे. मोबाइल आणि इंटरनेटच्या माध्यमातून माहिती संकलनाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि अचूक होणार आहे. तंत्रज्ञानाचा वापर केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता राष्ट्रनिर्मितीसाठी कसा करता येतो, याचे हे उत्तम उदाहरण ठरू शकते. मात्र, याच तंत्रज्ञानामुळे खासगीपणाच्या प्रश्नांनाही तोंड फुटले आहे. प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक माहिती सरकारकडे नोंदवली जाणार असल्यामुळे खासगीपणाच्या संरक्षणाचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. जनगणना आयुक्तांनी याबाबत नागरिकांच्या माहितीची गोपनीयता अबाधित राहील, अशी ग्वाही दिली आहे. या आश्वासनावर विश्वास ठेवत नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना प्रामाणिकपणे आणि पूर्ण सहकार्य करणे आवश्यक आहे. चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास त्याचा फटका अखेरीस समाजालाच बसतो.

जनगणना ही केवळ सरकारी प्रक्रिया नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. या प्रक्रियेतून उभा राहणारा डेटा पुढील अनेक वर्षे देशाच्या विकासाचा मार्ग ठरवणार आहे. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, रोजगार, शहरीकरण अशा अनेक क्षेत्रांतील धोरणे या आकडेवारीवर आधारित असतात. आज सुरू होणारी जनगणना ही केवळ विलंबित प्रक्रिया पूर्ण करण्याची औपचारिकता नसून, ती नव्या भारताचा आराखडा तयार करण्याची संधी आहे. बदलत्या सामाजिक वास्तवाला सामोरे जाताना वस्तुनिष्ठता, पारदर्शकता आणि समावेशकता या मूल्यांचा स्वीकार करणे अत्यावश्यक आहे.

जनगणनेच्या या राष्ट्रीय मोहिमेत प्रत्येकाने सक्रिय सहभाग नोंदवून, अचूक माहिती देऊन आणि प्रशासनाला सहकार्य करून राष्ट्रनिर्मितीत आपला वाटा उचलणे हीच खरी लोकशाहीची जाणीव ठरेल.

पान १ वरून

## सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये पाच....

श्रीमती पल्लवी बिरादार आणि डॉ. सायरील क्रिस्टो यांची उपस्थिती विशेष ठरली असून ते संपूर्ण बूटकॅम्पदरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रम समन्वयक प्रा. सुनिल शाखापुरे व डॉ. मुदस्सर नाईकवाडी यांचे नियोजन लाभले. सूत्रसंचालन प्रा. मानसी जाधव यांनी केले.

या बूटकॅम्पमध्ये प्रत्यक्ष समस्यांवर आधारित कार्यशाळा, तज्ज्ञांचे सत्र, स्टार्टअप संस्थापकांचे मार्गदर्शन आणि टीमवर्कच्या माध्यमातून नवोपक्रमात्मक दृष्टिकोन विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. चौथ्या दिवशी स्थानिक इनोव्हेशन इकोसिस्टम व सांस्कृतिक स्थळांना भेट, तर पाचव्या दिवशी फंडिंग संधी व बौद्धिक संपदा हक्क (IPR) यावर विशेष सत्र आयोजित करण्यात येणार आहे. अंतिम दिवशी पिचिंग सत्र होऊन उत्कृष्ट संघांचा गौरव करण्यात येणार आहे.

**बूटकॅम्पमधील प्रमुख उपक्रम :**

* तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर सत्र
* डिझाईन थिंकिंग व नवोपक्रम कार्यशाळा
* आयडिया जनरेशन व समस्या निराकरण उपक्रम
* स्टार्टअप मेंटरिंग सत्र
* इन्क्युबेशन सेंटर भेट
* आयडिया पिचिंग व मूल्यांकन प्रक्रिया
* हा बूटकॅम्प केवळ एक उपक्रम नसून विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना दिशा देणारा आणि 'आत्मनिर्भर भारत'च्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहे.

# श्री तुकारामजी मुंढे यांची वारंवार बदली ही राज्याच्या जनतेसाठी धक्कादायक बाब

मुंढे नावाच वादळ सरकारच्या काणात नेहमीच घोंगावत असते.जनुकाय मुंढे साहेब भ्रष्ट राजकीय पुढारी व अधिकाऱ्यांच्या स्वप्नात येतात व त्यांच्या मानगुटीवर बसतात की काय असे वाटत आहे.मुंढेनी सर्जीकल स्ट्राईक केला की,सरकारची आणि भ्रष्ट राजकीय पुढारी व भ्रष्ट अधिकाऱ्यांची घाबरगुंडी नेहमीच का उडत असते असे का ? या घटनांवरून स्पष्ट होते की, राज्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे रॅकेट आजही जिवंत आहे.राज्यात सर्व काही सुरळीत चालू असतांना सनदी (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदल्या वारंवार का होतात ? हा मोठा प्रश्न राज्याच्या १३ कोटी जनतेपुढे वारंवार उपस्थित होतो. अशा परिस्थितीत सर्वसामान्यांना वाटते की,हे राज्यात चाल्लय तरी काय !राज्यात अनेक कर्तव्यनिष्ठ अधिकारी आहेत आणि या अधिकाऱ्यांचा लाभ गरीब व सर्वसामान्यांना झाला असून मोठमोठ्या राजकीय पुढाऱ्यांची व अधिकाऱ्यांची पोलखोल झाली आहे व त्यांच्या मुसक्या सुध्दा आवळल्या आहे.एवढ काही सुरळीत सुरू असतांना दिनांक ३१ मार्च २०२६ मंगळवारला राज्य प्रशासनात मोठे फेरबदल करत तब्बल दहा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. अचानक बदल्यांचे आदेश होत असेल तर राज्याचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये नामवंत दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांचा समावेश आहे ही राज्याच्या दृष्टीने धक्कादायक आणि गंभीर बाब आहे. आश्चर्याची बाब म्हणजे गेल्या २१ वषार्तील मुंढे यांची ही २५ वी बदली असल्याचे सांगितले जाते.गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागात बदली झाली होती.२१ वर्षात २५ बदल्या म्हणजे सरासरी त्यांचा प्रत्येक विभागाचा कार्यकाळ अल्पसा रहाला.यावरून स्पष्ट होते की, सरकार कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांना आपले काम सुध्दा इमानदारीने करू देत नाही ही बाब नुकत्याच झालेल्या (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरून स्पष्ट होते. बदल्यांच्या कारणांची पडताळणी सरकार का करीत नाही ? आणि अधिकाऱ्यांच्या बदल्या त्यांचा कार्यकाळ अपुरा ठेवून वाटेल तेव्हा बदली करण्यात येते अशा परिस्थितीत अधिकारी वर्ग भ्रष्टाचारावर नियंत्रण कसे काय ठेवेल ! बदलीसाठी सरकारजवळ नियम किंवा काहीच लिमिट किंवा अटी नाहीत का ? केव्हाही बदली करणे ही बाब कोणत्या नियमात बसते, असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत आहे.सन्माननीय तुकाराम मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. नियुक्ती होताच त्यांनी संपूर्ण विभागाला धारेवर धरले व सर्व काळ्या चिठ्ठ्या बाहेर काढल्या व दिव्यांग कल्याण विभाग सुरळीत करण्याला सुरुवात केली.परंतु सरकारने अचानक बदल्यांचा भडीमार केल्याने सर्वसामान्यांचे मन दुखावले आहे.सरकारने ज्या दहा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत त्या जनकल्याणाच्या प्रती नसाव्यात असे मला वाटते.यात सरकारने आपली पोळी शेकण्यासाठी बदल्या केल्या असाव्यात अशी शंका महाराष्ट्राची सर्वसामान्य जनता वर्तवीत आहे.धडाकेबाज निर्णयासाठी प्रसिद्ध असलेले तुकाराम मुंढे यांची वारंवार बदली करून सरकार काय सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे ही बाब अजूनपर्यंत सर्वसामान्य जनतेला समजु शकली नाही. आतातर २१ वर्षात फक्त २५ बदल्या झाल्यात पुढे चालून ते भ्रष्ट राजकीय पुढारी व अधिकाऱ्यांना घाम सोडू शकते त्यामुळे त्यांच्या निवृत्तीच्या काळपर्यंत अंदाजे २०३५ पर्यंत बदलीची सेंच्युरी होऊ शकते यालाही नाकारता येत नाही.कारण मुंढे सारख्यांचे धाडसी कार्य कोणत्याही सरकारला पचणारे नाही.त्यामुळे कोर्ट कचेरीमध्ये ज्याप्रमाणे "तारीख पे तारीख" असा लपंडाव सुरू असतो त्याचप्रमाणे मुंढे सारख्यां कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची "बदली पे बदली" असा सरकारकडून लपंडाव सुरूच राहिल ही बाब स्पष्ट होते.शेवटी हाही सरकारचा रेकॉर्ड ग्रीनीज बुकमध्ये नोंदवीला जाऊ शकतो.तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण मधील अनेक गैरप्रकार समोर आणले असतांना त्यांची बदली झाली.त्यामुळे या गैरप्रकारांवर पांघरूण घालण्यासाठी मुंढेची बदली करण्यात आली आहे ही बाब स्पष्ट होते.आता मुंढेची बदली आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव या पदावर मंत्रालयात करण्यात आली आहे.याठीकाणीतरी सरकारने मुंढे साहेबांना आपल्या पध्दतीने काम करू द्यावे अशी सरकारकडून सर्वसामान्यांना अपेक्षा आहे. अन्यथा सर्वसामान्यांचा विश्वास सरकारवरून उठेल. मुंढे यांचा सर्वीस काळ अंदाजे २०३५ पर्यंत आहे मग २०३५ पर्यंत सरकार असाच लपंडाव खेळणार काय असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.या लेखाव्दारे सरकारला विनंती करतो की, सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा निश्चित कार्यकाळ ठरवावा व त्यानुसारच बदलीचे पाऊल उचलालेत जेणेकरून त्यांना आपले काम पुर्ण करण्याची संधी मिळेल.त्याचप्रमाणे सन्माननीय महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना विनंती करतो की, आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन बदल्यांच्या संदर्भात राज्य सरकारला ठोस नियमावली व अटींची जाणीव करून द्यावी जेणेकरून आयएएस अधिकारी आपला कार्यकाळ पूर्ण करून सर्वसामान्यांना दिलासा देऊ शकेल व राज्य सरकारची बदलीच्या सिलसिल्यावर अंकुश लागेल. सन्माननीय तुकाराम मुंढे यांच्या कायार्ला माझा सलाम. जय हिंद.



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं. ९९२१६९०७७९,
नागपूर.

## सोलापूर जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी सुनील पेंडसेः उपाध्यक्षपदी ॲड. मिलिंद कुलकर्णी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी सुनील पेंडसे यांची तर उपाध्यक्षपदी ॲड. मिलिंद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. बँकेच्या नूतन संचालक मंडळाने एकमताने ही निवड केली.

नुकत्याच झालेल्या सोलापूर जनता सहकारी बँकेच्या संचालकपदाच्या पंचवार्षिक निवडणुकीत परिवार पॅनलचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. विजयी झालेल्या नूतन संचालक मंडळाची बैठक उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा उपनिबंधक तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

या बैठकीत बँकेच्या अध्यक्षपदी सुनील पेंडसे यांची तर उपाध्यक्षपदी ॲड. मिलिंद कुलकर्णी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी सोलापूर जनता बँकेच्या मुख्य कार्यालयातील संचालक मंडळ सभागृहात निवडीची घोषणा केली. यावेळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी सोलापूर जनता सहकारी बँकेचे नूतन अध्यक्ष सुनील पेंडसे आणि उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा उपनिबंधक आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संचालक पुरुषोत्तम उडता, राजेश पवार, सी. ए. गिरीष बोरगावकर, रवींद्र साळे, संचालिका चंद्रिका चौहान, गौरी आमडेकर, संचालक डॉ. हर्षद डंबळ, सी. ए. आनंद करवंदे, सुरेश चिक्कळी, महादेव न्हावकर, प्रमोद भुतडा, विष्णू मोंढे, ॲड. मल्लिनाथ शहाबादे, अमित आपटे, चरणसिंग चौव्हाण, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे उपस्थित होते.





**नूतन पदाधिकारी आणि संचालक मंडळाचा बँकेतर्फे सत्कार**

सोलापूर जनता सहकारी बँकेचे नूतन अध्यक्ष सुनील पेंडसे आणि उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी तसेच सर्व संचालक मंडळाचा सत्कार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर जनता सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, देवदत्त पटवर्धन, मकरंद जोशी, सहाय्यक सरव्यवस्थापक रामदास सिद्धूल, तुळशीदास गज्जम, रमेश मामड्याल, मुख्य कार्यालयातील अधिकारी मदन मोरे, सुहास कमलापूरकर आदी उपस्थित होते.

## पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषदेमुळे कृषी क्षेत्राला नवी दिशा - मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई(कटूसत्य वृत्त):-:** पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषद ही केंद्र आणि राज्यांमधील समन्वय अधिक मजबूत करत शेती क्षेत्रासाठी ठोस दिशा देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.



या माध्यमातून घेतलेले निर्णय थेट महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रगतीस चालना देतील, असे मत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले. ते जयपूर येथे आयोजित पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषदेत बोलत होते.

देशातील कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या क्षेत्रीय परिषदांच्या मालिकेची सुरुवात जयपूर येथे पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषदेद्वारे झाली. या परिषदेत महाराष्ट्रासह राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात आणि गोवा राज्यांचे कृषी मंत्री आणि प्रतिनिधी सहभागी झाले. महाराष्ट्र शासन व कृषी विभागातर्फे राबविण्यात आलेले महाविस्तार अप, ॲग्रीस्टॅक व एआय धोरण यांचे या परिषदेत अनेकांनी कौतुक केले. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या परिषदेत केंद्र–राज्य समन्वय बळकट करणे, विविध कृषी योजनांचा आढावा घेणे तसेच आगामी खरीप हंगाम 2026 साठी धोरण निश्चित करणे यावर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेताना ॲग्रिस्टॅक अंतर्गत 1.32 कोटी शेतकऱ्यांची नोंदणी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यात क्षेत्रातील आघाडीचा उल्लेख केला. 2025–26 दरम्यान झालेल्या अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे राज्यातील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची माहितीही त्यांनी दिले.

सुमारे 136 लाख शेतकरी आणि 105 लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून राज्य शासनाने 20,196 कोटी रुपयांची मदत मंजूर असून यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष आभार त्यानी व्यक्त केले.

यावर्षीच्या सुरुवातीला देखील अवकाळी पावसाचा फटका बसत 29 जिल्ह्यांतील 2 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र बाधित झाले. सध्या प्रशासनाकडून पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून लवकरच बाधित शेतकऱ्यांना मदत वितरित करण्यात येणार आहे.

तसेच केंद्र सरकारकडेही अतिरिक्त मदतीची मागणी करण्यात आली आहे,असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. खरीप 2026 साठी राज्याने 158.92 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे उद्दिष्ट निश्चित केले असून बियाणे व खतांचा पुरवठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. बीबीएफ तंत्रज्ञान, ठिबक सिंचन आणि आधुनिक शेती पद्धतींचा वापर वाढवण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# ऑनलाईन प्लॅटफॉर्म, गिग आणि डिलिव्हरी क्षेत्रातील कामगारांची पडताळणी व सुरक्षितता आवश्यक - मंत्री ॲड. आकाश फुंडकर

**मुंबई(कटूसत्य वृत्त):-** ऑनलाइन प्लॅटफॉर्म, गिग आणि डिलिव्हरी वर्कर्समार्फत ग्राहकांना सुरक्षित सेवा पुरविली जावी, यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या पडताळणीवर भर देत ग्राहकांना ही सेवा निर्दोष, सुरक्षित आणि कायद्याच्या चौकटीत मिळावी, याकरिता सर्वसमावेशक आराखडा तयार करण्याचे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी कामगार आणि गृह विभागाच्या मंत्रालयात आयोजित संयुक्त बैठकीत दिले.



विविध डिलिव्हरी व सेवा देणाऱ्या कंपन्या ग्राहकांना घरपोच सेवा पुरविण्यासाठी डिलिव्हरी पार्टनर्स नियुक्त करतात.

सध्या या कंपन्या त्यांची ऑनलाईन, फेसलेस पद्धतीने नोंदणी करून नंतर ही माहिती थर्ड पार्टी व्हेरिफिकेशन एजन्सीकडे पाठवतात; मात्र या एजन्सींना पडताळणीचे अधिकार, त्यांच्या प्रक्रियेला कायदेशीर आधार ग्राहक व कामगार सुरक्षितता याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस माजी खासदार किरीट सोमय्या, कामगार विभागाच्या अपर मुख्य सचिव आय.ए. कुंदन, राज्य गुप्तवार्ता विभागाचे सह सचिव रवींद्र शिसवे, गृह विभागाचे उपसचिव अरविंद शेटे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कामगार मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, गिग व प्लॅटफॉर्म वर्कर्सची नोंदणी ज्या प्लॅटफॉर्मवर 'पार्टनर' म्हणून केली जाते, त्या कंपन्यांनीच या कामगारांची पार्श्वभूमी तपासाची व सुरक्षिततेची पूर्ण जबाबदारी स्वीकारली पाहिजे. डिलिव्हरीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांचे व्यवसायिक रजिस्ट्रेशन, चालकांकडे वैध ड्रायव्हिंग लायसन्स, पगार त्यांचे माध्यम या सर्व बाबींचा संबंधित सर्व विभागांच्या समन्वयाने अभ्यास करून सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, असे निर्देश मंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी दिले.

**सायबर विभागाकडे नोंदणी गरजेची**

राज्यातील ऑनलाइन फूड व अन्य वस्तू वितरण करणाऱ्या कंपन्यांमध्ये कार्यरत गिग व प्लॅटफॉर्म कामगारांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या नियमनासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज बैठकीमध्ये अधोरेखित करण्यात आली. राज्यातील बहुतेक ॲग्रीगेटर कंपन्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे काम करत असून, त्या थेट कर्मचारी भरती न करता तृतीय पक्ष (थर्ड पार्टी) संस्थांमार्फत गिग कामगारांची नियुक्ती करतात. त्यामुळे पारंपरिक नियोक्ता–कामगार संबंध निर्माण होत नाहीत आणि जबाबदाऱ्यांमध्ये अस्पष्टता राहते. गिग कामगारांची नियुक्ती प्रामुख्याने ॲप–आधारित प्रणालीद्वारे केली जाते.

यासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक तपशील, ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन कागदपत्रे, विमा, ई–श्रम नोंदणी यांसह विविध कागदपत्रे आवश्यक ठरवली जातात.

मात्र, या प्रक्रियेत एकसमान नियमावली गरजेची आहे. त्याचप्रमाणे सर्व गिग कामगारांची सायबर विभागाकडे नोंदणी, तसेच क्यूआर कोड असलेले ओळखपत्र बाळगणे सक्तीचे करण्याबाबत आणि ग्राहकांच्या मागणीनुसार सादर करणे अनिवार्य करण्याबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.

बैठकीत राज्यस्तरीय गिग कामगार नोंदणी व ऑनलाइन कंपन्यांची परवाना प्रणाली, तसेच डिजिटल ओळख व युनिक आयडी प्रणाली विकसित करणे, अपघात विमा व सामाजिक सुरक्षा योजना लागू करणे, तक्रार निवारण यंत्रणा व कंपन्यांची जबाबदारी निश्चित करणे आदी मुद्द्यावर चर्चा झाली. महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महिला प्रवाशांना महिला चालक निवडण्याचा पर्याय उपलब्ध करून देणे, प्रत्येक कंपनीने गिग कामगारांच्या कामकाजाचे नियमित ऑडिट करून संशयास्पद बाबी आढळल्यास तिमाही अहवाल पोलिसांकडे सादर करणे आदी मुद्द्यावरही यावेळी चर्चा करण्यात आली.

राज्यातील वाढत्या डिजिटल वितरण व्यवस्थेमध्ये नागरिकांची सुरक्षितता सर्वाधिक महत्वाची आहे.

त्यामुळे गिग व प्लॅटफॉर्म कामगारांसाठी गृह विभागाच्या समन्वयातून स्वतंत्र व स्पष्ट धोरणात्मक चौकट तयार करण्याचे निर्देशही मंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी दिले.

## निधन वार्ता

**आकाश सागर**



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोनीनगर, हुडको येथील आकाश सुधीर सागर (वय ३४) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे.

## वात्रटिका

### लक्ष्मणाची हाक

जोर लावून लढणार
आणि मी उभं राहणार...
दंड थोपटून बोलला की
मी माघार नाही घेणार...
दबाव मलिदा की अजून
कशामुळे रण सोडले...
लक्ष्मण रेषेवरच थांबले
त्यांना पत्रकारांनी झोडले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ज्येष्ठांचा आदर्श घेऊन तरुणांनी सायकलिंग कडे वळावे- आ. रणजितसिंह मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण ( पंजाब ) या सायकल वारीच्या माध्यमातून आज आरोग्य उत्तम रहावे म्हणून ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात सायकलिंगकडे वळले आहेत ही अभिमानाची बाब आहे. या ज्येष्ठांचा आदर्श घेऊन तरुणांनी सायकलिंगकडे वळावे असे आवाहन आ रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केले.

सायकल रायडर्स असोसिएशनच्या वतीने जागतिक आरोग्य दिन व माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित अकलूज ते अकलूज या सुमारे ७५ किलोमीटर माळशिरस तालुका सायकल राईडचे आयोजन करण्यात आले होते. अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथून सकाळी ६ वाजता अकलूज नगर परिषदेचे नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते या सायकल राईडचा शुभारंभ करण्यात आला. अकलूज – माळीनगर –२५/४ – महाळुंग – श्रीपूर – बोरगाव – माळखांबी – बोंडले – वेळापूर – खुडूस – माळशिरस – संग्रामनगर – अकलूज असा या सायकल राईडचा मार्ग होता .

माळशिरस येथे पंचायत समिती सभागृहात सभापती दत्ताभैय्या मगर यांनी सायकल रायडर्सचे स्वागत केले. त्याप्रसंगी आयोजित समारंभात आ मोहिते पाटील बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, सभापती दत्ताभैय्या मगर , इशिता मोहिते पाटील, गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



**सायकल राईडचे ठिकठिकाणी उत्साही स्वागत**
सायकल रायडर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या अकलूज ते अकलूज या सुमारे ७५ किलोमीटर सायकल राईडचे श्रीपूर येथे श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या पांडुरंग सायकल क्लबने, बोंडले येथे डॉ जयंत चव्हाण, वेळापूर येथे रिपाइंचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी, खुडूस येथे माजी सभापती मच्छिंद्र ठवरे यांनी, चव्हाण वस्ती येथे संदीपान चव्हाण यांनी तर अकलूज येथे अकलूज नगर परिषदेच्या वतीने मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी सायकलिंग काळाची गरज या विषयावर आंतरराष्ट्रीय सायकल रायडर्स सतीश जाधव (मुंबई) यांचे व्याख्यान झाले. ते म्हणाले , सायकल राईड सारखे उपक्रम समाजात आरोग्य विषयी जागरूकता निर्माण करतात, एकत्रितपणे सकारात्मक ऊर्जा देतात आणि नव्या पिढीला योग्य दिशा दाखवतात. घुमाण सायकल वारीने आरोग्य संपन्न वारीचा नवा आदर्श घालून दिला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील म्हणाले , सायकलिंगला अनन्य साधारण महत्व आहे. पूर्वी गरिबीमुळे सायकलीने प्रवास करावा लागत होता. आज आरोग्य उत्तम रहावे म्हणून सायकलिंग करावी लागत आहे ही चांगली बाब आहे.

अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी मोहिते पाटील यांच्या हस्ते व अकलूजचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व नगराध्यक्षा रेश्मा अडगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सहभागी सायकल रायडर्सना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले .

या राईडचे आयोजन सायकल रायडर्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष डॉ सुभाष कोकणे, सचिव सुरेंद्र पिसे, सह सचिव सुधाकर सोनवणे, विश्वस्त हर्षल सरोदे यांनी केले होते.

# सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक स्वागत समारंभ व प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नवीन शैक्षणिक वर्ष २०२६–२७ च्या पार्श्वभूमीवर केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक स्वागत समारंभ तसेच दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली. हा कार्यक्रम सिंहगड शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी शिक्षक व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. आपल्या भाषणात त्यांनी शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करत नवीन शैक्षणिक वर्षात नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन केले.



यानंतर दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेला सुरुवात झाली. या कार्यशाळेत काशीबाई नवले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कमलापूर (ता. सांगोला) येथील प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, डॉ. एस. व्ही. जगताप, डॉ. एस. पी. कांगडे व प्रा. आर. एन. नदाफ यांनी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणादरम्यान अध्यापन पद्धती, मानसशास्त्रीय सिद्धांत आणि प्रभावी धडा आराखडा (लेसन प्लॅन) या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच संवादात्मक सत्रे, गटचर्चा व प्रात्यक्षिकांमुळे कार्यशाळा अधिक प्रभावी ठरली.

अभिप्राय सत्रात शिक्षकांनी या प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निकहत शेख व सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

# वेळापूर येथे मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजींचा अमृत महोत्सव

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** वेळापूर येथे हिंदू वीरशैव लिंगायत समाजाचे वंदनीय पंचाचार्य जगदुरू यांच्या दिव्यसानिध्यात दि.९ एप्रिल ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत श्री बृहन्मठ वेळापूर ता.माळशिरस जि.सोलापूर येथे श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती श्री ष.ब्र.१०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजींचा अमृत महोत्सव आणि सुवर्ण पट्टाभिषेक महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि–९ एप्रिल रोजी पहाटे ६.०० ध्वजारोहण करून कार्यक्रमास सुरुवात होईल.पहाटे ६.३० ते सकाळी ८.०० या वेळेत गुरुगादीस रुद्राभिषेक,सकाळी ८.३० ते ११.०० यावेळेत गणेश याग व महारुद्रयाग स्वाहाकार व श्रीगुरू हस्ते दाम्पत्यांना शुभाशिर्वाद, सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत भजन– किर्तन व संगीत, दुपारी ४.०० ते सायंकाळी ७.०० नवचंडी याग स्वाहाकार,सायंकाळी ७.३० ते सायंकाळी ७.४५ श्रीगुरूंचे तुलाभार व श्रीगुरू हस्ते दाम्पत्यांना शुभाशिर्वाद रात्री ८.०० ते ९.०० धर्मसभा असा दैनंदिन कार्यक्रम दि.९ एप्रिल ते ११ एप्रिल २०२६ या तीन दिवसांत आयोजित केलेला आहे...
दि.१२ रोजी सकाळी १०.०० वाजता अय्याचार व शिवदिक्षा संस्कार कार्यक्रम आयोजित केलेला आहे.त्यासाठी पूर्व नोंदणी सुरू आहे.तसेच त्याच दिवशी दुपारी ४.०० ते रात्री ८.०० या वेळेत रंभापुरी पीठाचे



श्री.श्री.श्री.१००८ वीरसिंहासनाधिश्वर प्रसन्न रेणुक वीरसोमेश्वर शिवाचार्य महास्वामीजी,उज्जैन पीठाचे श्री.श्री. श्री.१००८ सद्धर्मसिंहासनाधिश्वर सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी,श्रीशैल पीठाचे श्री. श्री.श्री.१००८ सुर्यसिंहासनाधिश्वर डॉ.चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी,काशी पीठाचे श्री. श्री.श्री.१००८ ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी आणि काशी पीठाचे श्री.श्री.श्री.१००८ ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी या पाचही जगदुरूंची भव्य–दिव्य अड्डापालखी मिरवणुक सोहळा पालखी मैदान ते श्री बृहन्मठ वेळापूर होणार असून त्यानंतर रात्री ८.०० वाजता पंचाचार्य जगदुरू यांचे दिव्य सानिध्यात व अनेक शिवाचार्य यांच्या उपस्थितीत धर्मसभा संपन्न झाल्यानंतर उपस्थितांना महाप्रसाद होईल.

दि.१३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता जगदुरू यांच्या दिव्यसानिध्यात श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती श्री.ष.ब्र. १०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांना हरिद्रलेपन व अभ्यंग स्नान, सकाळी १०.३० वाजता उपस्थित शिवाचार्य, संतमहंत, सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचे सत्कार होतील. सकाळी ११.०० वाजता शिवाचार्य धर्मसंदेश आणि पंचाचार्य जगदुरूंचे प्रमुख आशिर्वचन झाल्यानंतर धर्मसभेची सांगता होवून उपस्थितांना महाप्रसाद होईल.

तरी सदरच्या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी सर्व सद्भक्तांनी सहकुटुंब उपस्थित राहून पंचाचार्य जगदुरू दर्शनाचा, कार्यक्रमांचा व गुरूकृपेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री बृहन्मठ वेळापूरचे नुतन मठाधीपती श्री.ष.ब्र.१०८ सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी यांच्या वतीने करण्यात आले आहे.


## जाहिर प्रसिध्दीकरण

क्रि.केस नं.९९४ / २०२४

**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. संभाजी रामचंद्र बरकडे,वय – ४६ वर्षे, धंदा– मजुरी, रा. रेल्वे स्टेशन कोळेगांव, ता. मोहोळ,जि. सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत डिकसळ,ता. मोहोळ, जि. सोलापूर } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचा मुलगा शुभम संभाजी बरकडे याचा जन्म ता.३०/०४/२००३ रोजी डिकसळ, ता. मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचा मुलगा शुभम संभाजी बरकडयाच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि. २७/०३/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे.मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता.१३/०३/२०२४

सही/–
लिपीक (शिक्का) तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण

क्रि.केस नं.३५६/२०२४

**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. संभाजी रामचंद्र बरकडे,वय– ४६ वर्षे,धंदा– मजुरी, रा. रेल्वे स्टेशन कोळेगांव, ता. मोहोळ,जि. सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत कोळेगांव,ता.मोहोळ, जि.सोलापूर. } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडिल रामचंद्र भानुदास बरकडे यांचा दि.१३/०९/२०२२ रोजी मौजे रेल्वे स्टेशन कोळेगांव, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे मृत्यु झाला असलेने अर्जदार हा त्यांचा मुलगा असुन त्यांनी सदर सामनेवाला यांचेकडे वडिल रामचंद्र भानुदास बरकडे यांच्या मृत्यु दाखल्याची ता.०४/४/२०२४ रोजी मागणी केलेली होती, परंतु सदर ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कोळेगांव ता.मोहोळ, जि. सोलापूर यांनी त्यांच्या अभिलेखात अनुक्रमे २०२२ च्या तारखेनुसार संपुर्ण अभिलेख तपासले असता अर्जदाराचे वडिल रामचंद्र भानुदास बरकडे यांच्या मृत्युची नोंद नमुद नसल्याचे दिसुन आलेले असुन त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात ग्रामपंचायत कोळेगांव, ता. मोहोळ चे मृत्यु रजिस्टरला अर्जदाराचे वडिल रामचंद्र भानुदास बरकडे यांचे मृत्युची नोंद घेवुन अर्जदार यांना तसे मृत्यु प्रमाणपत्र देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करणेबाबत अर्ज केला आहे. याबाबत कोणाची हरकत, आक्षेप असल्यास कि रोजी समक्ष २३/३/२०२६ अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावेत. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे मृत्युचा दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे.ता. १३/०३/२०२४

सही/–
लिपीक (शिक्का) तहसिलदार,मोहोळ,जि. सोलापूर.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र/अभिलेख/कावि//२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री. भिवा चंद्रकांत एडगे, वय–३८ वर्षे, धंदा– शेती चाकला रा. बिटले, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूद्ध**

ग्रामपंचायत नजिक पिंपरी ता. मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक नजिक पिंपरी ता.मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलाचा तुकाराम भिवा एडगे यांचा जन्म ता.०१/०६/१९८६ रोजी मौजे नजिक पिंपरी मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराच्या भाऊच्या जन्म दाखल्याची ता.२७/०३/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन १९८६ चे अभिलेखात अर्जदार यांच्या मुलाचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदाराच्या भाऊची जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. / /२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन१५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. / /२०२६

हुकूमावरुन
लिपीक (शिक्का) मा. तहसिलदार सो, मोहोळ


# न्यासाकडून स्वामी भक्तांकरिता उत्तम व्यवस्थापन- जिल्हाधिकारी कार्तिकेयन



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामी भक्तांकरिता उत्तम व्यवस्थापन होत असल्याचे मनोगत सोलापूर जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या उपस्थितीत सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ व जनता राजा छत्रपती शिवाजी महाराजांची कोरीव, सुबक प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी न्यासाच्या स्वयंपाक गृहाची पाहणी व कार्य व व्यवस्थापनाची माहिती घेतली. यावेळी तहसीलदार विनायक मगर, न्यासाचे विश्वस्त भाऊ कापसे, गटविकास अधिकारी शंकरराव कवीतके, अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक भीतावडे, अक्कलकोचे मंडल अधिकारी जुबेर नदाफ, तलाठी एस. डोईफोडे, हे उपस्थित होते.

या प्रसंगी न्यासाचे गोटू माने, एस.के.स्वामी,बालाजी कटारे, स्वामींनाथ बाबर, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील,गोविंदराव शिंदे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.


## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता,
### यांत्रिकी विभाग,सोलापूर, कुमठा नाका,उजनी वसाहत, सोलापूर–४१३००३.

Email ID- eemdsolapur@gmail.com, दूरध्वनी क्रमांक. (०२१७) २९९०७१४

**निविदा सूचना क्रमांक २१ (दुबार मागणी) सन २०२५–२०२६.**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे अधिकृत संगणक विक्रेता कडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहे. निविदा सूचना http://wrd.maharashtra.gov.in संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये (जी.एस.टी. व विमा वगळून) |
|---|---|---|---|
| १ | सिना माढा उपसा सिंचन (यांत्रिकी) उपविभाग, भिमानगर येथे वाहनचालकांचा पुरवठा करणेबाबत. | सोलापूर | ६,३९,९४९/– |

निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक ०८/०४/२०२६ (११ सकाळी) पासून ते दिनांक १६/०४/२०२६ (सायंकाळी १८.००)
निविदा उघडण्याचा दिनांक :– २०/०४/२०२६ (१२ सकाळी)
महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण– ०५२३ /(प्र.क्र.२५/२०२३ ) / यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७ /प्र.क्र. २४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील.
खालील संकेतस्थळावर ई–निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
http://wrd.maharashtra.gov.in (सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवर कळविण्यात येईल.).
निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.

जावक क्र./यां.वि.सोलापूर./लेखा–२/निविदा/७८२/सन २०२६.
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर यांचे कार्यालय
दिनांक :– २७/३/२०२६.
जिमाका/सो/जाहि/०६/२६–२७

सही/–
कार्यकारी अभियंता
यांत्रिकी विभाग, सोलापूर


# अमृत लक्षित गट परिवार सर्वेक्षण अभियान सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेअंतर्गत कार्यरत महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) मार्फत खुल्या प्रवगार्तील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यभर परिवार सर्वेक्षण अभियान राबविण्यात येणार आहे. हे सर्वेक्षण दि. ८ एप्रिल २०२६ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार कालावधी वाढविण्यात येऊ शकतो. अमृत संस्थेच्या लक्षित गटामध्ये सध्या ब्राह्मण, सिंधी, गुजराती, पटेल, राजपूत, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, जाट, वैश्य इत्यादी सुमारे २५ जातींचा समावेश असून, सर्वेक्षणानंतर यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. संस्थेमार्फत व्यक्तिमत्व विकास औद्योगिक व प्रगत कौशल्य विकास रोजगाराभिमुख प्रशिक्षण उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक आर्थिक सहाय्य स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन उद्योग व्यवसायासाठी व्याज परतावा योजना या प्रमुख योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे: या सर्वेक्षणाचा उद्देश लक्षित गटातील कुटुंबांची अचूक संख्या निश्चित करणे, त्यांच्या गरजा व अपेक्षा जाणून घेणे, तसेच स्थानिक संसाधने, कौशल्ये व आवडीनुसार नव्या योजनांची आखणी करणे हा आहे. या अभियानाद्वारे अमृत संस्थेच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती अधिकाधिक कुटुंबांपर्यंत पोहोचविणे, तसेच नागरिकांकडून अभिप्राय घेऊन भविष्यात अधिक परिणामकारक योजना राबविण्याचा मानस आहे.सदर कालावधीत अमृत संस्थेचे प्रतिनिधी लक्षित गटातील कुटुंबे, संस्था, संघटना व मंडळांशी संपर्क साधणार आहेत. तसेच संबंधितांनी स्वयंस्फूर्तीने जिल्हा व विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून आपल्या कुटुंबाची किंवा संस्थेची माहिती नोंदवावी, असे आवाहन करण्यात येत आहे. तरी लक्षित गटातील जास्तीत जास्त नागरिकांनी या सर्वेक्षणात सहभागी होऊन अमृत संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी (अमृत) विजय जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)


### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु–वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) अमेरिकेच्या नागरिकांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना– ****** योजना ३) लाभ, उत्सुक ४) नवीन (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळावर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, घोटाळा १२) मद्य, मीठी (हिंदीत) १३) फुलांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) झाड, ठेवा २१) बाळाच्या विरुद्धार्थी २३) दुष्ट (इंग्रजीत) २४) मनापासून, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २६) एक जगप्रसिद्ध धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या वडीलांचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता– *** भावे ३८) मनसे अध्यक्ष– ** ठाकरे ३९) दुध (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी बनवतात

आडवे शब्द : १) डा. राहुल गांधी यांचे नावामध्ये असलेले कुलनाम २) बारामती असलेले पवारांचे नाव– *** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी मालिका न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू– ** भट्ट १०) गावाचे चालक १३) गगन सुतकर यांचे एक गाणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू– ** शास्त्री १६) नाला १७) सासऱ्याच्या विरुद्धार्थी १९) भारताचा एक माजी फलंदाज– इंजमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसण्याच्या विरुद्धार्थी २५) विल्डिंग (मराठीत) २६) वाऱ्याचा आवाजी भाजवात २७) णफ उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) प्रवाला ३४) अमेरिकाने दिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) सुलतानाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिद्ध पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) कर्णेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची परत केलेली चुकवाचुकव ४४) दूध (हिंदीत)

## सुडोकु – 218

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# मोहोळ तालुक्यात अवकाळी पाऊस व चक्रीवादळामुळे मोठे नुकसान

## पंचनाम्यासाठी १५ एप्रिलला आंदोलनाचा इशारा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यात गेल्या दहा-बारा दिवसांपूर्वी आलेल्या भयानक चक्रीवादळ, अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे पिके, फळबागा तसेच कोणीही येथे बेदाणा शेडचे व बेदाणा याचे नुकसान तसेच घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे त्वरित पंचनामे करण्यात यावेत, अन्यथा १५ एप्रिल रोजी मोहोळ तहसील कार्यालयासमोर 'बोंबाबोंब' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्यन जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांनी दिला आहे.

पेनुर, कोन्हेरी, येवती, खंडाळी, पापरी, देवडी, हिवरे यांसह अनेक गावांमध्ये या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याबाबतचे



निवेदन प्रभाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ तहसीलदारांना देण्यात आले असून, त्याच्या प्रती मुख्यमंत्री, पालकमंत्री, कृषी मंत्री आणि महसूल मंत्र्यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

देशमुख यांनी सांगितले की, या आपत्तीमुळे सुमारे ३ कोटी २८ लाख रुपयांचे नुकसान झाले असून, आमदार राजाभाऊ खरे, खासदार ज्योतीताई वाघमारे तसेच मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. मात्र, शासनाकडून अद्याप आदेश न आल्यामुळे पंचनामे करण्यात आलेले नाहीत.

तसेच, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये पूर आणि चक्रीवादळामुळे सोहाळे, वडवळ व इतर गावांतील झालेल्या नुकसानीची भरपाईही अद्याप मिळालेली नाही. ती तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**निवेदनात पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत:**

- पिकांसाठी हेक्टरी ७० हजार रुपये नुकसान भरपाई.
- फळबागांसाठी १ लाख रुपये.
- घरांची पडझड झालेल्यांना १ लाख रुपये.
- पूरग्रस्तांना १० वर्षांच्या परतफेडीवर २ लाखांचे बिनव्याजी कर्ज.
- माती खरडून गेलेल्या शेतकऱ्यांना सरसकट मदत.

यावेळी नाना मोरे, गणेश चवरे, पिंटू पवार, देवडी सुभाष थोरात विनायक भोसले मंगेश अभिवंत कोन्हेरी दत्तात्रेय मुळे गोवर्धन शेळके दीपक जरग नाना कौलगे पेनुर संजय दत्त विष्णू भोसले शिवाजी जाधव,समाधान चवरे मानाजी चवरे, हरिभाऊ लोंढे, तानाजी मुळे, हनुमंत भोसले यांसह अनेक शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी एक संघ म्हणून कार्य करून सोलापूर जिल्ह्याचा लौकिक वाढवू या - जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सर्व शासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी सर्वप्रथम लक्षात घ्यावे की आपण एक लोक सेवक आहोत व लोकांची सेवा करणे ही आपली प्राथमिकता आहे. लोकांची सेवा करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांमध्ये परस्पर योग्य समन्वय असला पाहिजे, त्यासाठी आपण एक संघ म्हणून कार्य करू व सोलापूर जिल्ह्याचा लौकिक वाढवू या, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित सर्व विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी




अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कसेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन स्मिता पाटील, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, वीज वितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्यासह सर्व महसूल विभाग प्रमुख, इतर शासकीय विभाग प्रमुख त्याप्रमाणेच ऑनलाईन द्वारे सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन पुढे म्हणाले की, लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी एक टीम म्हणून पुढे आले पाहिजे. प्रत्येक शासकीय अधिकारी कर्मचारी यांनी लोकसेवक म्हणून आपली स्वतःची प्रतिमा स्वच्छ (Clean Image) व प्रामाणिक राहील यासाठी कटीबद्ध राहावे. सोलापूर जिल्ह्याची प्रशासकीय यंत्रणा सांघिकपणे काम करणारी व उत्कृष्ट असून पुढेही असेच सहकार्य अपेक्षित राहील, असे त्यांनी सूचित केले. यावेळी त्यांनी स्वतःचा परिचय करून दिला तसेच सर्व शासकीय यंत्रणांकडून कामकाजाबाबत त्यांच्या असलेल्या अपेक्षा विशेषतः Clean Image, Loyality खूप प्राधान्य असेल, असे सांगितले. त्याप्रमाणेच लोकांसाठी काम करणाऱ्या प्रत्येक शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सोबत आपण असल्याचा विश्वासही त्यांनी दिला.

सर्व विभाग प्रमुखांच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचे स्वागत केले व सर्व शासकीय यंत्रणा आपल्या सोबत असल्याची ग्वाही दिली.

# गारपीट आणि अवकाळी पावसाचा तडाखा

## मोहोळ तालुक्यातील पिकांचे मोठे नुकसान



**मोहोळ, (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यात काही दिवसांपूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. या अचानक बदललेल्या हवामानामुळे काढणीस आलेली पिके व फळबागा मोठ्या प्रमाणात जमीनदोस्त झाल्या असून शेतकऱ्यांच्या 'हातातोंडाशी आलेला घास हिरावला' गेल्याची भावना व्यक्त होत आहे. तालुक्यातील द्राक्ष, केळी, कांदा, पेरू यांसह विविध फळबागा, भाजीपाला आणि काढणीच्या उंबरठ्यावर असलेली पिके पूर्णतः नुकसानग्रस्त झाली आहेत.

आज सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील पापरी, येवती, खंडाळी आदी गावांना भेट देत प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी केली. तसेच शासनाने तातडीच्या उपाययोजना करून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पाहणी दौऱ्यावेळी मोहोळ तालुका काँग्रेस अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष राजेश पवार, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, कुमार गोडसे, बाबुराव भोसले, दत्तात्रय कदम, भारत मुळे, सुनील वाघमारे, उत्तम मुळे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# धर्मपूरी ग्रामपंचायत शुद्ध पाणी पुरवठा प्लॅन्टचा लोकार्पण सोहळा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** धर्मपूरी ता.माळशिरस येथे ग्रामस्थांना शुद्ध पाणीपुरवठा मिळावा म्हणून ग्रामपंचायत सदस्य अर्चना माने यांच्या संकल्पनेतून धर्मपुरी ग्रामपंचायतीच्या शुद्ध पाणी पुरवठा प्लॅन्टचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. याचे उद्घाटन लोकनियुक्त सरपंच निता नवनाथ झेंडे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष बाजीराव काटकर, माजी सरपंच विष्णू केंजळे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बापूनाना पाटोळे, सोसायटी चेअरमन लाला पाटोळे, व्हाईस चेअरमन भास्कर झेंडे, जयप्रकाश मसुगडे,



ग्रामपंचायत सदस्य मनोज निर्मळ, बाळासाहेब मसुगडे, तानाजी कर्णे, माजी चेअरमन संभाजी पाटील, मोहनदादा मोरे, माधव मोरे, धनंजय कुलाळ, विजयकुमार पवार, दादा काटकर, रामदास पाटील, संतोष जैन, रामचंद्र भोईटे, भारत निगडे, विनोद माने, राहुल कुंभार, गोरख कर्चे, बशीर शेख, पप्पू चव्हाण, प्रविण काशीद, दादा झेंडे, बिटू पवार, देविदास केंजळे, भालचंद्र पाटील, रमेश मसुगडे, मोहन मसुगडे, केशव धायबर, वसंत पाटोळे, मंगेश तारू, किसन खिलारे, नितीन पाटोळे, सौरभ निगडे, सौरभ झेंडे, अथर्व झेंडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

# महापुरुषांचे पुतळे पुर्व परवानगी घेवूनच उभारावेत - प्रातांधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींचे पुतळे उभारण्याबाबत राज्य सरकारने मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली असून, महापुरुषांचे पुतळे उभारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घ्यावी लागेल. कोणतीही व्यक्ती संघटना संस्था किंवा खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय पुतळा उभा करू शकणार नाही. पूर्व परवानगी शिवाय पुतळा उभारल्यास संबंधित व्यक्ती, संस्था किंवा समितीवर दंडात्मक कारवाई यासोबतच कायदेशीर कारवाई येणार असल्याचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींचे पुतळे उभारण्याबाबतच्या मार्गदर्शनासाठी पोलीस संकुल, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, पोलीस निरीक्षक टी. वाय.मुजावर, सहा. पोलीस निरिक्षक श्री गोसावी, योगेश लंगुटे, तसेच तालुक्यातील मंडल अधिकारी, पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी श्री.इथापे म्हणाले, राज्यातील विविध गावांत महापुरुषांचे पुतळे उभारले जातात. या महापुरुषांच्या महान कार्याचे कायम स्मरण व्हावे आणि त्यातून नवीन पिढीने प्रेरणा घ्यावी हा त्यामागचा उद्देश आहे. परवनगी घेवून पुतळा उभारण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य मिळेल. यासाठी राष्ट्रपुरुषाचा पुतळा उभारायचा असलेल्या जागेच्या



मालकीहक्काबाबत वाद असता कामा नये, सदर जागा अनधिकृत नसावी, पुतळा उभारल्यामुळे संबंधित शहर किंवा गावाच्या सौंदर्याला बाधा येणार नाही याची आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न होणार नाही याची खबरदारी घ्यावी, पुतळ्याच्या देखभालीची आणि पावित्र्य राखण्याची जबाबदारी संबंधित संस्थेला घ्यावी लागेल. केवळ परवानगी घेऊनच पुतळा उभारून चालणार नाही तर त्याची देखभाल करणे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. पुतळा उभारणारे संस्थेने पुतळ्याच्या क्ले मॉडेल ला कलासंचालनालयाची मान्यता घेऊनच पुतळा तयार करावा. मान्यता केलेल्या मॉडेल प्रमाणेच पुतळा उभारण्याची दक्षता घ्यावी. तसेच महाराष्ट्र हे थोर समाजसुधारकांच्या विचार व कार्याचे परंपरा लाभलेले राज्य आहे. नागरिकांनी धर्म जातपंथांचा नेहमी आदर करून जातीय सलोखा कायम ठेवावा, असे आवाहन प्रांताधिकारी इथापे यांनी केले.

यावेळी सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे म्हणाले, अनधिकृत पुतळा उभारण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. पुतळा उभारण्याबाबत आवश्यक परवानगी घ्यावी. पोलीस पाटील हे ग्रामस्थ आणि प्रशासनाचा दुवा आहे त्यांनी गावात अनधिकृतपणे पुतळा बसवण्यात येणार असल्याची माहिती तात्काळ प्रशासनाला द्यावी. चुकीच्या पद्धतीने पुतळे उभारल्यास कायमचे नुकसान आहे ज्या ठिकाणी पुतळा उभारण्यात येणार आहे त्या ठिकाणी तो उभारण्यासाठी आवश्यकता परवानगी घेणे आवश्यक आहे. पुतळा उभारल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. चुकीच्या पद्धतीने पुतळा उभारणाऱ्या युवा वर्गावर एकदा गुन्हा दाखल झाला तर युवा वगार्चे भविष्य कायमचे खराब होते त्यामुळे पुतळा उभारताना आवश्यक त्या परवानग्या घेऊनच पुतळा उभारावा.

पुतळे उभारण्याबाबत परवानगी मागणाऱ्या संस्था नोंदणीकृत असणं आवश्यक आहे.पुतळा उभारण्यामुळे गावात कुठल्याही प्रकारचा वाद निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य कामांसाठी करण्याचा अधिकार पुतळा उभारणाऱ्यांना असणार नाही. उभारण्यात आलेल्या पुतळ्याचे पावित्र्य व सुरक्षितता राखावी असे तहसीलदार लंगुटे यांनी सांगितले. महापुरुषांनी समाज उभा करण्याचे काम केले आहे तसेच समाज व्यवस्था कशी चांगली राहील याची काळजी घेतली. महापुरुषांचे विचार आपण जीवनात रुजवावेत असे गटविकास अधिकारी अमोल जाधव यांनी सांगितले.

# भागवत जगताप यांचे वार्धक्याने निधन

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** चव्हाणवाडी - टेंभुर्णी (तालुका माढा जिल्हा सोलापूर) येथील तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्व रहिवासी भागवत जगताप उर्फ भाऊ (वय 97 वर्षे) यांचे सोमवार दिनांक 6 एप्रिल 2026 रोजी रात्री 10 वाजण्याच्या सुमारास वार्धक्यातील अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे पश्चात 2 मुले, 1मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये छोट्या मोठ्या निवडणुकांमध्ये चव्हाणवाडी गावातील नागरिक "भाऊ" यांचा शब्द प्रमाण मानत. त्यांच्या निधनामुळे चव्हाणवाडी गावावर शोककळा पसरली आहे. प्रेमळ स्वभाव, सर्वांशी सुसंगत्व सत्य बोलणे यामुळे सर्वत्र अतिशय प्रिय होते.

त्यांच्या निधनाची बातमी कळताच सर्व क्षेत्रातील आणि स्तरातील मान्यवरांनी अंत्ययात्रेत सहभागी होऊन शोक व्यक्त केला.

कै.भागवत जगताप यांचा तिसऱ्याचा विधी बुधवार दिनांक 08/04/2026 रोजी सकाळी होणार आहे.

टेंभुर्णी येथील वृत्तपत्र विक्रेते जनसेवा न्युज पेपर एजन्सी चे मालक ज्येष्ठ पत्रकार महादेव जगताप पत्रकार अनिल जगताप यांचे ते वडील होत.

# श्रीमती भारती गवळी यांचा तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील उंबरे दहिगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विषय शिक्षिका श्रीमती भारती गवळी यांनी शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी आणि विद्यार्थी पटनोंदणी वाढीसाठी केलेल्या कामाबद्दल माळशिरस पंचायत समितीच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते नुकतेच प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

माळशिरस तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने नुकतेच तालुक्यातील 39 शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव करण्यात आला. यावेळी पंचायत समिती सभापती दत्ता मगर, उपसभापती मनीषा पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

श्रीमती गवळी यांची शैक्षणिक क्षेत्रातील सेवा जवळपास 28



वर्षे इतकी झाली आहे. शिक्षण विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात त्यांनी सक्रीय सहभाग घेऊन उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये 100 टक्के पटनोंदणी, गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम, अध्यापनात डिजीटल तंत्राचा उपयोग, विद्यार्थ्यांसाठी नवनिर्मिती प्रोत्साहनपर उपक्रम, माता-पालकांचा शालेय उपक्रमात सहभाग, सांस्कृतिक कार्यक्रम आणि लोकवर्गणीतून शाळेचा विकास, विविध प्रशिक्षण कार्यक्रमात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन, मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न अशा सामाजिक कामांमध्येही हिरीरीने त्यांनी पुढाकार घेतला आहे.

नुकत्याच, शालेय शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षक-अधिकारी-कर्मचारी स्पर्धेत श्रीमती भारती गवळी यांनी तालुका आणि विभागस्तरावर प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरावर सहभाग नोंदवला होता.

श्रीमती भारती गवळी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांनी तसेच उंबरे दहिगाव ग्रामस्थ, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आणि सहशिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सोलापूर जिल्ह्यातील आरोग्य सेवा सक्षम करण्यावर भर देणार - सभापती केदार सावंत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आले. केंद्र सरकारच्या 'आभा' कार्ड योजनेला गती देण्यासाठी आशा सेविका, आरोग्य कर्मचारी आणि इतर विभागांमध्ये समन्वय वाढवण्याचे आदेश देण्यात आले. वाढती लोकसंख्या आणि भौगोलिक गरजा लक्षात घेता नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच आरोग्य विभागातील रिक्त पदे भरतीसाठी शासन स्तरावर पत्रव्यवहार करून तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत कंत्राटी भरती प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.



जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा आरोग्य समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच संबंधित विभागाचे इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि सर्वसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

या बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी जिल्ह्यातील सर्व आरोग्य योजनांची तसेच सन २०२५-२६ मधील आरोग्य योजनांबाबतची आर्थिक व भौतिक आकडेवारी सादर केली. ग्रामीण भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये स्वच्छतेबाबत विशेष मोहीम राबवून परिसर निर्जंतुक ठेवण्यावर भर देण्यात यावा. आशा स्वयंसेविकांना वैद्यकीय किट वाटप आशा ताईंना प्रशिक्षण देऊन स्थानिक रुग्णांना किरकोळ आजारांवर जागीच उपचार देण्यासाठी सक्षम केले जाईल. यासाठी त्यांना वैद्यकीय किट वाटप करणे व कायम औषध पुरवठ्यासाठी सेस फंडातून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. सरकारी रुग्णालयांवरील विश्वास वाढवण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नाविन्यपूर्ण योजना राबवाव्यात असे निर्देश देण्यात आले.

आरोग्य विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यासोबतच राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत कंत्राटी भरती करण्याचे निर्देश देण्यात आले. रुग्णांशी बोलताना सौजन्य, नमता आणि तत्परता ठेवून त्यांना दजेर्दार सेवा देण्याचे आदेश देण्यात आले, जेणेकरून रुग्णांना खासगी दवाखान्यात जाण्याची गरज भासणार नाही. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये स्वच्छता राखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले. परिसर निर्जंतुक ठेवणे आणि रुग्णांना सुरक्षित वातावरण देणे ही जबाबदारी अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पार पाडावी, अशा सूचना शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिल्या.

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दजेर्दार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी



अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.